# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर, आज राष्ट्रीय दिवस समारंभात करणार प्रदान

लोकसभेत अर्थसंकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील पुरवणी मागण्या मंजूर

केंद्र सरकार पुढील तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडणार

**आणि**

सहाव्या आशियाई महिला कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद मिळवल्याबद्दल भारतीय महिला कबड्डी संघाला 67 लाखांचे रोख बक्षीस प्रदान

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन जाहीर  करण्यात आला.  मॉरिशसचे पंतप्रधान नवीन चंद्र रामगुलाम यांनी काल भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात ही घोषणा केली. पंतप्रधान मोदी यांना मिळालेला हा 21 वा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. मॉरिशसच्या 57 व्या राष्ट्रीय दिवस समारंभात आज मोदी यांना हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदी आज या समारंभाला प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. ते दुसऱ्यांदा या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहत आहेत. या कार्यक्रमात भारतीय लष्कराची एक तुकडी आणि नौदलाचे एक जहाज सहभागी होणार आहे.

मॉरिशसच्या सर्वोच्च सन्मानाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन्मानाबद्दल मॉरिशस सरकार आणि नागरिक यांचे आभार मानले. हा फक्त त्यांचा सन्मान नाही, तर भारत आणि मॉरिशस यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा सन्मान आहे, असं त्यांनी सांगितलं.   यावेळी त्यांनी मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम आणि त्यांच्या पत्नी वीणा यांना तसंच मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोकुळ आणि त्यांच्या पत्नी वृंदा यांनाही ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया कार्ड जारी करत असल्याची घोषणा केली.  दरम्यान, काल मोदी यांनी मॉरिशसच्या पंतप्रधानांबरोबर, संरक्षण, आर्थिक,

सांस्कृतिक आदान प्रदान आदी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याबाबत दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली.

**मूर्मू**

निरोगी समाजाच्या निर्मितीत डॉक्टर आणि संशोधकांची मोठी भूमिका असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी म्हटलं आहे. भटिंडा इथं अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या पहिल्या दीक्षांत समारंभात त्या काल बोलत होत्या. आरोग्यदायी जीवनशैली आणि चांगल्या शेती पद्धती स्वीकारण्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी, कृषी आणि पर्यावरण तज्ज्ञांशी चर्चा करून संशोधून करण्याचं आवाहन त्यांनी डॉक्टरांना केलं. अमली पदार्थांच्या व्यसनामुळं होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक हानीविषयी लोकांना जागरुक करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

**लोकसभा**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात काल लोकसभेत अर्थसंकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील पुरवणी मागण्या,2021-22 साठी अतिरिक्त अनुदानाच्या मागण्या, मणिपूर अर्थसंकल्प 2025-26  आणि मणिपूर 2024-25 साठी पुरवणी मागण्यांना मंजुरी देण्यात आली. यावेळी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मणिपूरसाठी आकस्मिक निधी स्थापन करण्यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली. मणिपूरमधील अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी केंद्र सरकार शक्य ती सर्व आर्थिक मदत करत आहे, असं त्यांनी सांगितलं. सरकारनं चालू आर्थिक वर्षात निव्वळ अतिरिक्त 51 हजार 462 कोटी रुपये खर्च करण्यासाठी संसदेची मंजुरी मागितली आहे.

देशातून होणारी संरक्षण क्षेत्राची निर्यात 2013-14 च्या तुलनेत 2023-24 मध्ये 30 पटीनं वाढली असल्याचं सीतारामन यांनी यावेळी सांगितलं. वर्ष 2013-14 मध्ये संरक्षण निर्यात केवळ 686 कोटी रुपये होती, ती 2023-24 मध्ये 21 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. भारत सध्या 85 देशांमध्ये संरक्षण उत्पादने आणि उपकरणे निर्यात करत आहे आणि 100 कंपन्यांचा विकासात वाटा आहे, असंही त्यांनी सांगितलं.  त्यानंतर सभागृहात विनियोजन विधेयक 2025, विनियोजन विधेयक (क्रमांक २) 2025, मणिपूर विनियोजन विधेयक 2025 आणि मणिपूर विनियोजन (वोट ऑन अकाउंट) विधेयक 2025 देखील मंजूर केले.  लोकसभेत काल स्थलांतर आणि परदेशी नागरिकांशी संबंधित विधेयक सादर करण्यात आलं. स्थलांतर कायद्यांचं आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशानं हे विधेयक सादर करण्यात आलं. पारपत्र, प्रवास कागदपत्रे, व्हिसा आणि नोंदणीबाबत केंद्र सरकारला काही अधिकार प्रदान करण्याच्या तरतुदी यामध्ये आहेत. या विधेयकात मूलभूत अधिकारांचं उल्लंघन होत असल्याचं सांगत काँग्रेसचे मनीष तिवारी यांनी या विधेयकाला विरोध केला.
कामकाज पूर्ण झाल्यानंतर, सभागृहाचे कामकाज आजपर्यंत तहकूब करण्यात आले.

**अधिवेशन संसद**

केंद्र सरकार पुढील तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल राज्यसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना दिली.2025-26 मध्ये दोनशे कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडली जाणार असल्याचं नड्डा यांनी सांगितलं.  कर्करोगाच्या रुग्णांवर तपासणीनंतर 30

दिवसांच्या आत उपचार सुरू होत असून राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत, सरकार, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी काम करत असल्याचंही नड्डा यांनी म्हटलं आहे.

**प्रधान -पाठ्यपुस्तके**

भारतीय पाठ्यपुस्तक योजनेच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये इंग्रजीसह सर्व 22 भाषांमध्ये पाठ्यपुस्तकांचं डिजीटायझेशन केलं जात आहे. अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल राज्यसभेत शिक्षण मंत्रालयाच्या कामकाजाच्या चर्चेला उत्तर देताना दिली. सर्व माध्यमिक शाळांमध्ये इंटरनेट ब्रॉडबँड स्थापित करण्यात येणार असून भारतनेटला हे काम देण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.  शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी 500 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून, राष्ट्रीय शिक्षण धोरणात कोणतीही भाषा लादण्यात आलेली नाही असंही प्रधान यावेळी म्हणाले. राष्ट्रीय शिक्षण धोरण हे मातृभाषेवर आधारित शिक्षणासाठी आहे. बहुभाषिकता ही सध्याची गरज आहे असंही त्यांनी नमूद केलं. या वर्षी केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षणासाठी एक लाख 28 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली असून, मागील वर्षापेक्षा 6.22 टक्के जास्त आहे, असंही प्रधान यांनी नमूद केलं.

**पाकिस्तान रेल्वे**

पाकिस्तानमध्ये बलुचिस्तानमध्ये मंगळवारी क्वेटाहून पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्स्प्रेस या प्रवासी रेल्वेचं दहशतवाद्यांनी अपहरण केलं. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात रेल्वे चालक जखमी झाला असून शंभरहून अधिक प्रवाशांना ओलीस ठेवण्यात आलं आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. सरकारी प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत 13 अतिरेकी ठार झाले असून पाक सुरक्षा दलाने 80 प्रवाशांची सुटकाही केली आहे.

**अमेरिका-युक्रेन**

युक्रेनने तीस दिवसांच्या तत्काळ आणि अंतरिम युद्धबंदीच्या प्रस्तावाला सहमती दर्शवली असून त्याला प्रतिसाद देण्याची जबाबदारी रशियावर असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेने, युक्रेनला गुप्तचर माहिती सामाईक करणं आणि लष्करी मदत पुरवण्यावरील विरामही उठवला आहे. सौदी अरेबियात युक्रेनच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मॅक्रो रुबियो यांनी वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात, युद्धबंदी लागू करण्याच्या कराराला परस्पर सहमतीने मुदतवाढ देता येऊ शकेल असं म्हटलं असून शांतता राखण्यासाठी रशियाकडून परस्पर सहकार्य महत्त्वाचे असल्याचं म्हटलं आहे.

**कबड्डी**

भारतीय महिला कबड्डी संघाचा सहाव्या आशियाई महिला कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद मिळवल्याबद्दल क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी सत्कार केला. त्यांनी या संघाला 67 लाख 50 हजार रुपयांचं रोख बक्षीस जाहीर केलं. महिला खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल. पुरुषांच्या लीगप्रमाणेच, महिलांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकार महिला कबड्डी लीग सुरू करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**बॅडमिंटन**

बर्मिंगहम इथं सुरू असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेन आणि मालविका बनसोड यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.   पुरूष एकेरीत एचएस प्रणॉयला आणि मिश्र दुहेरीत सतीश करुणाकरन आणि आद्या वरियथ या जोडीला पराभव पत्करावा लागला. महिला दुहेरीत तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोनप्पा जोडीचा मुकाबला हसीह पेई-शान आणि हंग एन-त्झू यांच्याशी होणार आहे. तसंच पीव्ही सिंधू महिला एकेरीचा सामना खेळेल तर सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुरुष दुहेरीत खेळणार आहेत. महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांच्या जोडीसह प्रिया कोंजेंगबम आणि श्रुती मिश्रा देखील उद्या खेळतील. शिवाय, रोहन कपूर आणि रुत्विका गड्डे आणि ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या जोड्या मिश्र दुहेरीत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया हिवाळी खेळांचा दुसरा टप्पा आज गुलमर्ग इथं समाप्त होणार आहे. समारोप समारंभाला केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय उपस्थित राहणार आहेत. या खेळांचा पहिला टप्पा 23 ते 27 जानेवारी दरम्यान लडाखमध्ये यशस्वीरित्या पार पडला. इथल्या एनडीएस स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि गुफुक तलाव इथं आइस हॉकी आणि आइस-स्केटिंग स्पर्धा झाल्या. भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि जम्मू-काश्मीर क्रीडा परिषदेनं या स्पर्धांचं उत्कृष्ट नियोजन केल्याचं  भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे उपमहासंचालक विनीत कुमार यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**पॅरा ॲथलेटिक्स**

नवी दिल्ली इथं काल सुरू झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्स स्पर्धेच्या पहिल्या दिवशी पुरुषांच्या डिस्कस थ्रो एफ इलेव्हन स्पर्धेत भारतानं तिन्ही पदकं जिंकली. महिलांच्या गटात भारताच्या प्रीती पालनं रौप्यपदक मिळवलं. पुरुषांच्या गटात 100 मीटर थाळीफेकमध्ये विशूने रौप्यपदक आणि प्रगदीश्वर राजा मूर्तीनं कास्यपदक मिळवलं. पुरुषांच्या 100 मीटर टी13 स्पर्धेत   भारताच्या मीत हरेशकुमार ताधानीनं कास्यपदक जिंकलं. पुरुषांच्या 100 मीटर टी35 मध्ये अभिषेक जाधवनं रौप्यपदक, तर विनयनं   कास्यपदक जिंकले. पुरुषांच्या 100 मीटर टी44 प्रकारात भारतानं वर्चस्व गाजवलं. यात  मित पटेलनं 12.67 सेकंदात धावत सुवर्णपदक जिंकलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**